# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६००४.

परिपत्रक क्र. कोविमं/शाखा-उमा/खा.वि/ 1114 दिनांक- १३/०९/२०२१

**विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ.१२ वी ) व माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र ( इ.१०वी ) परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्याच्या ऑनलाईन (ONLINE) नावनोंदणी अर्जाबाबत..**

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त संपर्क केंद्र व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, राज्यात कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे शासनाने लॉकडाऊन / संचारबंदी जाहिर केली होती व वेळोवेळी सदरचा कालावधी वाढवल्यामुळे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र ( इ.१०वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांसाठी (फार्म नं १७) ऑनलाईन नावनोंदणी माहे जुलै ऐवजी माहे-सप्टेंबर -२०२१ पासून सुरू करण्यात येत आहे.

१.इयता १० वी सन २०२२ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांकरिता माध्यम निहाय संपर्क केंदे निश्चित करण्यात आली आहेत. या केंद्राच्या केंद्र प्रमुखांची सभा ऑनलाईन पध्दतीने **दि.१६ /०९ /२०२१** ते दि.२४/०९/२०२१ या कालावधीत घेण्यात येऊन त्यांना सुचना दयावयाचे आहेत.

२. खाजगी विदयार्थ्यांनी इ.१२ वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याची मुदत गुरूवार दि.**१६/०९/२०२१ ते मंगळवार दि. १२/१०/२०२१** अशी आहे. ऑनलाइन भरलेल्या अर्जाची प्रिंट काढून मूळ कागदपत्रासह व विहित शुल्क रु.५००/- नोंदणीशुल्क + रु.१००/- प्रक्रिया शुल्क याप्रमाणे **शुक्रवार दि.१७/०९/२०२१ ते गुरूवार दिनांक १४/१०/२०२१** या कालावधीत संबधित संबधित संपर्क केंद्र शाळेत / कनिष्ठ महाविद्यालयात जमा करावे. व संपर्क केंद्र शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांचेकडे आवश्यक कागदपत्रासह प्राप्त झालेले विद्यार्थ्यांचे **मूळ अर्ज,ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची एक छायाप्रत , मूळ कागदपत्रे व त्यांच्या साक्षांकित प्रति व विद्यार्थ्यांची यादी सोमवार दिनांक- १८/१०/२०२१ पर्यंत विभागीय मंडळ कार्यालयात समक्ष जमा करावेत.**

३. खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१०वी व इ.१२ वी साठी नाव नोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

४.विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मंडळाच्या खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी / इंग्रजीमधून उपलब्ध आहेत.

**( इ . १० वी ) http.//form17.mh-ssc.ac.in**

**( इ . १२ वी ) http.//form17.mh- hsc.ac.in**

५. विद्यार्थ्यांने अर्ज भरण्याकरीता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नसल्यास व्दितीयप्रत २) मुळ गुणपत्रक व प्रमाणपत्र ३) आधारकार्ड ४) स्वत:चां पासपोर्ट आकारातील फोटो स्वत:जवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरताना सदर कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत.

Letter /pawar 415

६) कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलव्दारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य **(Compulsory)** आहे.

७) संपूर्ण अर्ज भरुन झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेल वर पाठविली जाणार आहे. तसेच या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआउट, ऑनलाईन शुल्क पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत काढून घ्यावी.

८. शाळा सोडल्याचा दिनांक व दाखला दिल्याचा दिनांक याबाबत पात्रतेसाठी शाळा सोडल्याचा दिनांक ग्राहय धरण्यात यावा. कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे इ.१०वी, इ.१२वी सन २०२१ चा निकाल जुलै-ऑगष्ट मध्ये लागलेला असल्याने, खाजगी विद्यार्थी ऑनलाईन नाव नोंदणीबाबत शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या दाखल्यावरील शाळा/कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याची तारीख **३१/०८/२०२१** अशी ग्राहय धरण्यात यावी. सदर बदल कोविड-१९ मुळे फक्त २०२२ च्या परीक्षेपुरताच लागू राहील. तथापी विद्यार्थ्यांच्या वयासाठी दिनांक ३१ जुलै अशी तारीख राहील.

९. खाजगी विद्यार्थ्यांने इ.१० वी व इ.१२ वी साठी नावनोदंणी अर्ज हे ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्याचा ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

१०) विद्यार्थ्यांनी अर्ज,विहित शुल्क व मूळ कागदपत्रे नाव नोंदणी अर्जावर नमूद केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विहित मुद्तीत जमा करावयाची आहेत.

११. खाजगी विद्यार्थ्यासाठी नाव नोंदणी शुल्काचा तपशिल खालील प्रमाणे-

इ.१० वी **रूपये १०००**/- नोंदणी शुल्क + रूपये **१००**/- प्रक्रिया शुल्क (Processing fee)

इ.१२ वी **रूपये ५००**/- नोंदणी शुल्क + रूपये **१००**/- प्रक्रिया शुल्क (Processing fee)

१२. **<u>विद्यार्थ्यानी अर्ज, ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोच पावतीच्या दोन छायाप्रती व मुळ कागदपत्रे नाव नोंदणी अर्जावर नमुद केलेल्या संपर्क शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विहित मुदतीत जमा करावयाची आहेत.</u>** खाजगी विद्यार्थी योजनेतंर्गत अर्ज करु इच्छिणारे कोणताही विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

| अ.क्रं. | अर्ज क्रमांक | विद्यार्थ्यांचे संपूर्ण नाव | शुल्क (रुपये) | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१३. खाजगी क्लासेस कडून जर विद्यार्थ्यांचे फॉर्म नं.१७ बंचमध्ये येत असतील तर त्याची नोंद स्वतंत्रपणे ठेवण्यात यावी व त्याची चौकशी करण्यात यावी.

**१३.अ)** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन करावयाची आहे. नावनोंदणी करताना विद्यार्थ्यांचा पत्ता, त्याने निवडलेल्या माध्यम निहाय संपर्क केंद्राची यादी दिसेल त्यापैकी एका संपर्क केंद्राची निवड विद्यार्थ्यांने करावयाची आहे. या संपर्क केंद्राने प्रकल्प, प्रात्यक्षिक परीक्षा , श्रेणी विषय संदर्भातील कामकाज व अनुषंगीक मुल्यमापन करावयाचे आहे.

**ब)** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन करावयाची आहे. नावनोंदणी करताना विद्यार्थ्यांचा पत्ता, त्याने निवडलेली शाखा व माध्यम निहाय त्यास कनिष्ठ महाविद्यालयाची यादी दिसेल त्यामधील एका कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्यांने करावयाची आहे. त्या

कनिष्ठ महाविद्यालयाद्वारे परीक्षा अर्ज, प्रकल्प, प्रात्यक्षिक/तोंडी,श्रेणी परीक्षा दयावयाची आहे. कनिष्ठ महाविद्यालयाची यादी दिसेल त्यामधील एका कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्यांनी करावयाची आहे. त्या कनिष्ठ महाविद्यालयाव्दारे परीक्षा अर्ज, प्रकल्प, प्रात्यक्षिक/तोंडी श्रेणी परीक्षा दयावयाच्या आहेत. याबाबत सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना विभागीय मंडळ मार्गदर्शन करतील.

१४.इयता १२ वी साठी विद्यार्थ्यांनी जे कनिष्ठ महाविद्यालये निश्चित केले असेल त्या कनिष्ठ महाविद्यालयांनी उपरोक्त १३ (ब) मधील सर्व कामे करणे अनिवार्य असेल.

१५) विहित शुल्क रोखीने क.महाविद्यालयात जमा करावयाचे आहे. कनिष्ठ महाविद्यालयांनी अर्जासोबत दिलेल्या पावत्यांपैकी विद्यार्थ्यांसाठीच्या प्रतीवर स्वाक्षरी व शिक्का देवून ती विद्यार्थ्यांकडे द्यावी. पावतीची दुसरी प्रत अर्जासोबत जोडून विभागीय मंडळाकडे पाठवायची आहे. पावतीची तिसरी प्रत कनिष्ठ महाविद्यालयांने स्वत: कडे संग्रहित ठेवावयाची आहे.

१६) विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत छाननीसाठी प्राप्त झालेली मूळ कागदपत्रे अर्जाची छाननी झाल्यानंतर कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत परत करण्यात यावीत. सदर कागदपत्रे त्यांचेमार्फत विद्यार्थ्यांना परत मिळाल्याची खातरजमा करावी.

१७) दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हायचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या/ प्राधिकृत केलेल्या हॉस्पिटलच्या प्रमाणपत्राची छायाप्रत प्रमाणित करून अर्जासोबत सादर करावी. व आवश्यकते नुसार विभागीय मंडळ / कनिष्ठ महाविद्यालय / संपर्क केंद्र यांचे कडून माहिती प्राप्त करून घ्यावी. दिव्यांग विद्यार्थ्यांना विषययोजना तसेच परीक्षेसाठी असलेल्या सवलती याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे.

१८) ऑनलाईन अर्ज भरताना कोणतीही अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत दुरध्वनी **क्र.०२०-२५७०५२०७/२५७०५२०८/२५७०५२७१** वर संपर्क साधावा.

१९) ज्या कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्याला कला, शास्त्र व वाणिज्य शाखेत प्रवेश घ्यायचा असेल त्या कनिष्ठ महाविद्यालयास सदरच्या शाखेस मंडळाची मान्यता असणे आवश्यक आहे.

२०) परराज्यातील विद्यार्थ्यांनी फॉर्म नं.१७ भरला असेल तर, ज्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत संबधित विद्यार्थी परीक्षेचे आवेदनपत्र भरणार आहे त्या कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत योग्यता प्रमाणपत्र (ELIGIBILITY CERTIFICATE) अर्ज विभागीय मंडळाकडे येणे आवश्यक आहे.

२१) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इ.१०वी परीक्षेसाठी एका शाळेने संपर्क केंद्राने फक्त २५० नावनोंदणी अर्ज स्विकारावेत.

२२) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१२ वी परीक्षेसाठी प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयाने स्वत:च्या कनिष्ठ महाविद्यालया **व्यतिरिक्त** फक्त **५०** नावनोंदणी अर्ज स्विकारावेत.

२३) मार्च २०२० प्रमाणेच जुलै-ऑगस्ट २०२० मध्ये इ.१० वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी २०२२ च्या इ.१२ वी परीक्षेस खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होण्यास सदरचे विद्यार्थी पात्र ठरतील.

२४) इ. १० वी व **इ.१२ वी सन २०२२- खाजगी विद्यार्थी फॉर्म नं.१७ ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने ( Debit Card/Credit Card/UPI/Net Banking ) द्वारे भरणे अनिवार्य राहिल. ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केल्यानंतर विद्यार्थ्याला पोचपावती प्राप्त होईल. सदर पोचपावती स्वत:जवळ ठेवून त्याच्या दोन छायाप्रती संपर्क केंद्राला व कनिष्ठ महाविद्यालयात देण्यात याव्यात. तसेच एकदा नाव नोंदणी अर्ज सादर केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव नाव नोंदणी शुल्क विद्यार्थ्याला परत केले जाणार नाही. तसेच नाव नोंदणी**

**अर्जात दुरूस्ती करावयाची ( उदा. माध्यम, शाखा, संपर्क केंद्र अथवा अन्य कारणास्तव ) असल्यास विद्यार्थ्यास पुन:श्च नाव नोंदणी शुल्क ऑनलाईन जमा करावे लागेल याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

२४) विद्यार्थ्यांना नाव नोंदणी प्रमाणपत्र ऑनलाईन देण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी तसेच विद्यार्थ्यांनी अर्जासोबत छाननीसाठी दिलेली मुळ कागदपत्रे संपर्क केंद्र/ कनिष्ठ महाविद्यालयाकडून निर्धारित कालावधी नंतर परत घेवून जाण्याची दक्षता घ्यावी.

२५) पात्र विद्यार्थ्यांना नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे (Examination form) मंडळाने विहित केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक असल्याबाबतची सूचना विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयामार्फत करून द्यावी.

(श्री. देविदास कुलाळ)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव सविनय सादर,

१) सर्व मान्यता प्राप्त संपर्क केंद्र व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली व कोल्हापूर.

२) मा.सचिव,महाराष्ट्र राज्य माध्य.व उच्च माध्य.शिक्षण मंडळ,
भांबुर्डा,शिवाजी नगर,पुणे.

Letter /pawar 418